# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:26.11.2024** **वार:मंगळवार**

---

**ठळक बातम्या,**

- राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशनला केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी; राज्यात दोन रेल्वे मार्गिकांनाही मान्यता
- संविधान स्वीकृतीच्या अमृत महोत्सवी वर्षाला आजपासून प्रारंभ; राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज संसदेच्या दोन्ही सभागृहांना संबोधित करणार
- संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी अदानी प्रकरणावरुन दोन्ही सभागृहात गदारोळ; कामकाज दिवसभरासाठी तहकूब
- भविष्यात भारताच्या विकासात सहकार क्षेत्राचा सिंहाचा वाटा असेल, असा पंतप्रधानांचा विश्वास
- राज्यात सत्ता स्थापनेच्या हालचालीना वेग; मुख्यमंत्रीपदासंदर्भात अद्याप निर्णयाची प्रतीक्षा आणि
- बॉर्डर गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेच्या पहिल्या सामन्यात भारताचा ऑस्ट्रेलियावर 295 धावांनी विजय

**मंत्रिमंडळ निर्णय**

केंद्रीय मंत्रिमंडळानं काल नैसर्गिक शेती, रेल्वे आणि तरुणांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असे विविध निर्णय घेतले. मंत्रिमंडळ बैठकीनंतर माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव वार्ताहरांशी बोलताना याबाबत माहिती दिली. रेल्वे मंत्रालयाच्या 7927 कोटी रुपयांच्या योजनांना मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये राज्यातल्या मनमाड-जळगाव या 160 किलोमीटरच्या चौथ्या रेल्वे मार्गिकेचा, तसंच भुसावळ-खांडवा दरम्यानच्या मार्गिकेचाही समावेश आहे. नैसर्गिक शेतीला चालना देण्यासाठी राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन सुरू करण्यात येणार असून त्यासाठी 2481 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आला. या मिशनमध्ये एक कोटी शेतकऱ्यांना सामावून घेतलं जाईल. युवकांसाठी अटल इनोवेशन मिशनच्या दुसऱ्या टप्प्यालाही मंजुरी देण्यात आली असून तिचा विस्तार करण्यासाठी 2028 पर्यंत 2750 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

**रिजिजू**

आज भारतीय राज्यघटना दिन आहे. 75 वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी भारत सरकारनं राज्यघटनेचा स्वीकार केला होता. त्या घटनेला 75 वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त सरकारनं आजपासून वर्षभर विविध कार्यक्रम साजरे करण्याची घोषणा केली आहे. 26 नोव्हेंबर 2025 पर्यंत देशभरात वर्षभराचे उत्सव सुरू राहतील. यानिमित्त दिल्लीत आज संविधान सदनच्या सेंट्रल हॉलमध्ये एका भव्य कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या सदस्यांना संबोधित करतील. संविधान दिनानिमित्त सर्वोच्च न्यायालयानं पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या उपस्थितीत आज एका कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे.

**रॅली**

राज्यभरात सर्वत्र संविधान दिनानिमित्त आज विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. पुण्यात समाज कल्याण विभाग आणि बार्टी यांनी संयुक्तपणे आज सकाळी संविधान फेरीचं आयोजन केलं आहे. भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचं सामुहिक वाचन करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून या संविधान फेरीला सुरुवात होईल.

**अधिवेशन**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी, अदानी उद्योग समूहाच्या कथित लाचखोरीच्या मुद्दयावरुन विरोधकांनी दोन्ही सभागृहांमध्ये गदारोळ केला. त्यामुळे दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. तत्पूर्वी दोन्ही सदनांमध्ये दिवंगत सदस्यांना आदरांजली वाहण्यात आली. आज संविधान दिनानिमित कामकाज होणार नाही; उद्या, दोन्ही सभागृहांच्या कामाला प्रारंभ होईल. दरम्यान, संसदेत विधायक, अर्थपूर्ण चर्चा झाली पाहिजे. अधिकाधिक खासदार चर्चेत सहभागी झाले पाहिजेत, अशी अपेक्षा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. ते काल अधिवेशनापूर्वी संसद भवन परिसरात प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

**सहकार परिषद**

भविष्यात भारताच्या विकासात सहकार क्षेत्राचा सिंहाचा वाटा असेल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल व्यक्त केला. नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. सहकार क्षेत्र म्हणजे भारतीय संस्कृतीचा पाया आहे. भारतात सहकारी संस्थांची संकल्पना ही आता चळवळ बनली आहे, असं मत त्यांनी व्यक्त केलं. पंतप्रधानांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष 2025 निमित्त एका विशेष टपाल तिकीटाचं प्रकाशनही झालं. भूतानचे पंतप्रधान दाशो शेरिंग तोबगे आणि फिजीचे उपपंतप्रधान मनोआ कामिकामिका हे या परिषदेला

उपस्थित आहेत. सहा दिवस चालणाऱ्या परिषदेत जगभरातील सहकार क्षेत्रातील तज्ज्ञ सहभागी झाले आहेत.

**सत्ता स्थापना**

विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर राज्यात सत्तास्थापनेबाबत विविध पातळ्यांवर चर्चा सुरु आहे. महायुतीतल्या शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या विधिमंडळ पक्षांच्या नेत्यांची निवड झाली आहे. शिवसेनेच्या गटनेतेपदी विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतेपदी अजित पवार यांची निवड झाली. मात्र भाजपा विधिमंडळ पक्षाची नेतानिवड अद्याप बाकी आहे.

**ठाकरे**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या विधिमंडळ गटनेतेपदी आमदार आदित्य ठाकरे यांची एकमतानं निवड करण्यात आली. विधानसभेच्या गटनेतेपदी आमदार भास्कर जाधव यांची तर प्रतोदपदी आमदार सुनील प्रभू यांची निवड झाल्याची माहिती विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी काल पत्रकारांना दिली.

**प्रीतीसंगम**

राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त काल कराड इथं प्रीतीसंगम या त्यांच्या समाधीस्थळी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आदरांजली अर्पण केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनीही यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन केलं. राज्याच्या मुख्यमंत्रिपदासंदर्भात महायुतीतले तीनही पक्ष एकत्रितपणे निर्णय घेतील आणि राज्याला स्थिर सरकार देऊ, असं अजित पवार यांनी त्यानंतर प्रसारमाध्यमांना सांगितलं.

अझरबैजानमध्ये बाकु इथं झालेल्या हवामान बदलविषयक कॉप-29 परिषदेच्या अखेरीला विकसनशील देशांना 2035 पर्यंत दरवर्षी 300 अब्ज डॉलर्सचा वित्त पुरवठा करण्याचा करार मान्य करण्यात आला. परंतु विकसनशील देशांनी त्यावर अनेक हरकती नोंदवल्या आहेत. याविषयीचा हा वृत्तांत...

**हवामान बदलाचा सामना करण्यात विकसनशील देशांना मदत करण्यासाठी विकसित देश दरवर्षी 100 अब्ज डॉलर्स उभारतील अशी तरतूद 2015 च्या पॅरीस करारामध्ये होती. ही तरतूद 2035 पर्यंत दरवर्षी तिप्पट करण्याचं विकसित देशांनी बाकु इथं मान्य केलं पण विकसनशील देशांनी ती तुटपुंजी असल्याचं सांगून प्रत्यक्षात 1 पूर्णांक 3**

**ट्रीलियन डॉलर्स मागितले आहेत आणि हा करार एकतर्फी झाल्याचा रोष व्यक्त केला. भारताच्या प्रतिनिधी चांदनी रैना यांनी आपली निराशा ठणकावून व्यक्त करताना विकसित देश हवामान बदलाबाबत त्यांची जबाबदारी पूर्ण करण्यास इच्छुक नाहीत हेच यातून स्पष्ट होतं असं सांगितलं. 300 अब्ज डॉलर्स 2035 पर्यंत दरवर्षी दिले जाण्याचं उद्दिष्ट फारच दूरचं आहे आणि ही रक्कम अनुदान किंवा स्वस्तातील कर्जाच्या स्वरुपात दिली जाईल का याची कोणतीही हमी त्यांनी दिलेली नाही. ही रक्कम विकसनशील देशांमध्ये खनिज इंधनांचा वापर कमी करून पवन आणि सौर यासारख्या नवीकरणीय ऊर्जांचं उत्पादन वाढविण्यासाठी सहाय्य करेल. वर्तमान वर्षात जगानं उष्णतेच्या आजवरच्या तीव्र लाटा आणि जीवघेण्या वादळांचं थैमान अनुभवल्याच्या पार्श्वभूमीवर बाकु हवामान वित्त कराराची कसोटी ठरणार आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, मनोज क्षीरसागर, पुणे.**

**वैष्णव**

भारतीय रेल्वेमध्ये कुठल्याही प्रकारे खाजगीकरण होणार नसल्याचं सरकारनं संसदेमध्ये स्पष्ट केलं असल्याचं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. नागपूर इथं काल अखिल भारतीय अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती रेल्वे कर्मचारी संघटनेच्या वतीनं आयोजित वार्षिक सर्वसाधारण सभा आणि राष्ट्रीय अधिवेशनाचं उद्घाटन वैष्णव यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमात संविधानाची शपथ घेण्यात आली. ही संविधानाप्रती निष्ठा असल्याचं वैष्णव यांनी नमूद केलं.

**समाधी सोहळा**

आळंदी यात्रेनिमित्त राज्यभरातून लाखो भाविक आळंदीत दाखल झाले आहेत. आज कार्तिकी एकादशी आणि गुरुवारी माऊलींचा संजीवन समाधी सोहळा आहे. या निमित्तानं विविध ठिकाणी हरिनाम सप्ताह आणि ज्ञानेश्वरी पारायण सुरू आहे.

**क्रिकेट**

बॉर्डर- गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या क्रिकेट सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियावर दणदणीत विजय मिळवला आहे. अनुभवी कर्णधार रोहित शर्मा संघात नसताना नितीशकुमार रेड्डी आणि हर्षित राणा यांसारखे नवखे गोलंदाज बरोबर घेऊन जसप्रीत बुमराहच्या नेतृत्वाखालील भारतीय संघानं ऑस्ट्रेलियाचा 295 धावांनी पराभव केला. यशस्वी जयस्वाल आणि के एल राहुलनं पहिल्या गड्यासाठी 201 धावांची भागीदारी केली; त्यानंतर विराट कोहलीने शतक

ठोकत धावांचा डोंगर रचला. 533 धावांचं आव्हान पार करताना ऑस्ट्रेलियाला 238 धावांपर्यंत मजल मारता आली. दोन्ही डावात मिळून 8 बळी घेणारा जसप्रीत बुमराह सामनावीर ठरला. या मालिकेतला दुसरा कसोटी सामना ॲडलेड इथं 6 ते 10 डिसेंबर दरम्यान खेळवला जाणार आहे.

**ढोले पाटील निधन**

पुण्याचे माजी महापौर उल्हास ढोले पाटील यांचं काल पुण्यात अल्पशा आजाराने निधन झालं. ते 81 वर्षांचे होते. पुणे महानगरपालिकेत 1974 पासून त्यांनी  नगरसेवक म्हणून काम केलं. 1976 मध्ये ते महापौर होते. 1992 मध्ये ढोले पाटील आणि त्यांच्या पत्नी असे दोघेही निवडून आले होते. पुण्यातील कैलास स्मशानभूमीत काल त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

**हवामान**

राज्याच्या विविध भागात थंडी वाढत आहे. येत्या 24 तासात राज्यात हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**